# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः01.04.2024** **वारःसोमवार**

---

1. आरबीआयच्या नव्वदपूर्ती सोहोळ्यात उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान आज एक दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर
2. प्रमुख राजकीय पक्षांद्वारे लोकसभा निवडणूक प्रचाराचा आरंभ
3. राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या प्रमुखपदी सदानंद दाते रुजू
4. जलपायगुडी जिल्ह्यात काल झालेल्या जोरदार वादळामुळे किमान चार जण ठार आणि
5. येत्या गुरुवारपर्यंत ईशान्येकडील भागात पाऊस आणि वादळाचा जोर वाढण्याचा हवामान खात्याचा अंदाज

**पंतप्रधान-मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज एक दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. आपल्या दौऱ्यात ते रिझर्व्ह बँकेच्या 90 व्या वर्धापन दिनाच्या समारंभाला उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारामन आणि अर्थ राज्यमंत्री भागवत कराड तसंच पंकज चौधरी या कार्यक्रमात सहभागी होणार असून, आरबीआयचे गव्हर्नर शक्तीकांत दास या कार्यक्रमाला संबोधित करणार आहेत. 1 एप्रिल 1935 रोजी स्थापना झालेली रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, आज 90 व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्यानिमित्त या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, तसंच विविध बँका आणि उद्योगांचे प्रतिनिधी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**पंतप्रधान-मेरठ रॅली**

आगामी लोकसभा निवडणूक, केवळ सरकार निवडण्यासाठी नाही, तर विकसित भारत आणि देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी आहे, असं पंतप्रधान आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी काल उत्तर प्रदेशातील मेरठ मध्ये भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केली. भाजपनं मेरठ मधून रामायण या गाजलेल्या मालिकेतले कलाकार अरुण गोविल यांना उमेदवारी दिली आहे. यावेळी राष्ट्रीय लोकदलाचे अध्यक्ष जयंत चौधरी यांच्यासह भाजपचे अनेक नेते उपस्थित होते. उत्तर प्रदेशात सात टप्प्यात मतदान होणार आहे.

**विरोधीपक्ष रॅली-भाजप**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेसह अनेक मुद्द्यांचा निषेध करण्यासाठी आय एन डी आय ए या विरोधी पक्षांच्या महा विकास आघाडीनं काल दिल्लीच्या रामलीला मैदानावर महामोर्चा काढला. विरोधी पक्षांना धमकवण्यासाठी केंद्र सरकार विविध यंत्रणांचा गैरवापर करत असल्याचा आरोप, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी केला. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी विरोधकांनी एकजुटीनं लढलं पाहिजे असंही ते म्हणाले.

**एस. जयशंकर**

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी भारताच्या अध्यक्षतेखालील जी वीस कार्यक्रमाचे वर्णन राजकीय आणि आर्थिक पुनर्संतुलनाचे उदाहरण म्हणून केलं आहे. काल नवी दिल्लीत सभ्यता फाउंडेशनने आयोजित केलेल्या दिल्ली हेरिटेज कार्यक्रमात जयशंकर बोलत होते. संपूर्ण देशाने जी वीसचे अध्यक्षपदाचा आनंद साजरा केला अशी भावना त्यांनी व्यक्त केली. 'राजकीय आणि

आर्थिक पुनर्संतुलन' नंतर आता लक्ष 'सांस्कृतिक पुनर्संतुलन' कडे वळले असून यशस्वी आयोजनामुळे संपूर्ण जगाने त्याची दाखल घेतली असल्याचं जयशंकर यांनी यावेळी सांगितलं.

**<u>नौदल-समारोप</u>**

भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय सराव, टायगर ट्रायम्फ 2024 चा समारोप समारंभ काल विशाखापट्टणम मध्ये USS सॉमरसेट या जहाजावर आयोजित करण्यात आला होता. हा सराव दोन्ही देशांमधील, भक्कम धोरणात्मक भागीदारीचं प्रतीक असून, त्याचा उद्देश बहुराष्ट्रीय HADR संचालन हाती घेण्यासाठी सर्वोत्तम पद्धती आणि मानक कार्यप्रणाली सामायिक करण्याचा आहे. विशाखापट्टणम मध्ये 18 ते 25 मार्च दरम्यान या सरावाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमाचा भाग म्हणून दोन्ही नौदलातल्या जवानांनी होळीचा सण साजरा केला. सागरी सराव 26 ते 30 मार्च या कालावधीत आणि त्यानंतर काकीनाडा मध्ये सैन्याच्या लँडिंगसह, सागरी टप्पा पार पडला. यामध्ये दोन्ही देशांच्या क्रॉस डेक सह इतर हेलिकॉप्टर संचलनही घेण्यात आलं. तिन्ही दलांच्या विशेष दलांनी या सरावात सहभाग घेतला आणि अमेरिकेच्या समकक्षांसोबत, बंदर आणि सागरी टप्प्यात संयुक्त संचलन केलं.

**<u>सदानंद दाते</u>**

भारतीय पोलिस दलातील अधिकारी सदानंद दाते यांनी काल राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या प्रमुखपदाची सूत्रे हाती घेतली. सेवेतून निवृत्त झालेल्या दिनकर गुप्ता यांच्याकडून त्यांनी हा पदभार स्वीकारला. दाते हे महाराष्ट्र केडरचे 1990 च्या तुकडीचे अधिकारी असून यापूर्वी ते महाराष्ट्रातील दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. मीरा भाईंदर, वसई विरारच्या पोलीस आयुक्त या पदांसह त्यांनी महाराष्ट्रात अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केलं आहे. कायदा आणि सुव्यवस्था विभागाचे सहआयुक्त आणि मुंबई गुन्हे शाखेचे सहआयुक्त तसच केंद्रीय अन्वेषण विभागाचे उपमहानिरीक्षक आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाचे महानिरीक्षक म्हणून त्यांनी काम केलं आहे. नोव्हेंबर 2008 मध्ये मुंबईवर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा शौर्याने सामना केल्याबद्दल त्यांना राष्ट्रपती पोलिस पदक तर 2007 आणि 2014 मध्ये उत्कृष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलिस पदकाने त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.

**<u>NTA</u>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं पदवीपूर्व अभ्यासक्रमांसाठीची सामाईक विद्यापीठ प्रवेश परीक्षेची ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत 5 एप्रिलपर्यंत वाढवली आहे. यापूर्वी अर्ज दाखल करण्याचा काल शेवटचा दिवस होता. उमेदवार आणि इतर संबंधित घटकांकडून प्राप्त झालेल्या विनंतीवरून ही मुदतवाढ देण्यात आली आहे. एनटीए, विविध केंद्रीय विद्यापीठे आणि इतर संस्थांमध्ये पदवीपूर्व कार्यक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षा आयोजित करते. या अभ्यासक्रमासाठीच्या परीक्षा 15 ते 31 मे दरम्यान होणार आहेत.

**<u>पंजाब - गहू</u>**

पंजाबमध्ये रब्बी हंगामातील गहू खरेदीची प्रक्रिया आजपासून सुरू होत आहे. यासाठी शासनाने सर्व व्यवस्था पूर्ण केली आहे. यावेळी राज्यात 35 लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रात गव्हाची पेरणी झाली असून 161 लाख मेट्रिक टनांहून अधिक गव्हाचे उत्पादन अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना देण्यासाठी एप्रिल महिन्याकरिता 27 हजार कोटी रुपये प्राप्त झाले आहेत तर मे महिन्यासाठी उर्वरित रक्कम लवकरच प्राप्त होईल. पंजाब मंडी बोर्डाने 1 हजार 908 नियमित खरेदी केंद्र घोषित केले असून खरेदी संस्थांच्या प्रस्तावानुसार विविध संस्थाना त्याचे वाटप करण्यात आलं आहे.

**<u>मायामी टेनिस</u>**

टेनिसमध्ये इटलीच्या जॅनिक सिनरने अमेरिकेतील मायामी खुल्या स्पर्धेत पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले. द्वितीय मानांकित सिनरने काल रात्री झालेल्या अंतिम फेरीत बल्गेरियन खेळाडू ग्रिगोर दिमित्रोव्हचा 6-3, 6-1 असा पराभव केला. या जेतेपदासह सिनर स्पेनच्या कार्लोस अल्काराजला मागे टाकून एटीपी जागतिक क्रमवारीत कारकिर्दीतील सर्वोच्च दुसऱ्या स्थानावर

पोहोचेल. बिगरमानांकित अमेरिकन खेळाडू डॅनिएल कॉलिन्सने महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले. कॉलिन्सने अंतिम फेरीत कझाकस्तानच्या एलेना रायबाकीनाचा 7-5, 6-3 अशा सरळ सेटमध्ये पराभव केला.

**<u>पूर्वोत्तर पाउस</u>**

मणिपूरच्या अनेक भागात पाऊस आणि गारपिटीमुळे काल थौबलच्या सपम लेइकाई आणि खोंगजोम गावांमध्ये घरे, इमारती आणि पिकांचे नुकसान झाले. ईशान्येकडील राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत असून, या भागातील पायाभूत सुविधांचे गंभीर नुकसान झालं आहे. आसाममध्ये गुवाहाटी विमानतळावर छताचा काही भाग कोसळला. भारतीय हवामान खात्याने 4 एप्रिलपर्यंत आसामसह इतर ईशान्येकडील राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी आणि मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

**<u>जलपायगुडी-वादळ</u>**

पश्चिम बंगालमध्ये, जलपायगुडी जिल्ह्यात काल झालेल्या जोरदार वादळामुळे किमान पाच जण ठार झाले तर 100 हून अधिक जण जखमी झाले आहेत. सोसाट्याच्या वाऱ्यानं जिल्ह्याच्या अनेक भागात तसंच जवळच्या परिसरात झाडं उन्मळून पडली आणि घरांचं नुकसान झाल्याची माहिती जलपायगुडीचे पोलीस अधीक्षक उमेश खांडबहाले यांनी दिली. मदत कार्यासाठी शीघ्र कृती दल कार्यरत असून, जिल्हा प्रशासन आवश्यक ती मदत करेल, असं आश्वासन पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बाधितांना दिलं.

**<u>केरळ-पूर</u>**

केरळमध्ये, काल संध्याकाळी मध्य आणि दक्षिणेकडील जिल्ह्यांमधल्या किनारी भागात लाटा उसळल्यामुळे जिल्हा-स्तरीय आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसंच नागरिकांनाही या समुद्रकिनाऱ्यांवर न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. कल्लक्कडल असं संबोधल्या जाणाऱ्या या घटनेत समुद्राबाहेर लाटांचा पूर येतो.

**<u>पाउस</u>**

येत्या गुरुवारपर्यंत ईशान्येकडील भागात पाऊस आणि वादळाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. याशिवाय अरुणाचल प्रदेशात मुसळधार पाऊस आणि हिमवृष्टीचीही शक्यता तर आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि सिक्कीममध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तसच जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा आणि चंदीगडमध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.